# मिरा भाईंदर महानगरपालिका

## विशेष स्थायी समिती सभा दि. १४/११/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १४/११/२००८ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. १२/११/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ७) | श्रीम. हेलन गोविंद | -- | सदस्य |
| ८) | श्री. याकुब कुरेशी | -- | सदस्य |
| ९) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १०) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ११) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| २) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| ३) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ४) | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | -- | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बालाजी खतगावकर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ३) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ४) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ५) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ६) | श्री हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| ७) | श्री. स्वप्नील सावंत | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| ८) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| ९) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १०) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| ११) | श्री. एन के. सोनार | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| १२) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १३) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १४) | डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| २) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ३) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ४) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| ५) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ६) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | श्री. सुनिल यादव | -- | चौकशी अधिकारी |
| ८) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ९) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १०) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ११) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १२) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १३) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १४) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १५) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १६) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| १७) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |
| १८) | श्री. राज घरत | -- | सिस्टीम ॲनालीस्ट, नागरी सुविधा केंद्र |
| १९) | श्री. किरण राठोड | -- | विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग |

**अनिल सावंत :-**

साहेब, आजच्या सभेचे पिठासिन अधिकारी म्हणून मी मा. याकुब कुरेशी यांचे नाव सुचित करतो.

**शानु गोहिल :-**

माझे ह्याला अनुमोदन आहे.

**याकुब कुरेशी (पिठासिन अधिकारी) :-**

आजच्या सभेस मा. अध्यक्ष नसल्यामुळे पिठासिन अधिकारी म्हणून माझी नेमणूक केली. त्याबद्दल मी सभासदांचे धन्यवाद करतो. आणि त्याचप्रमाणे सभेला सुरूवात करावी अशी मी विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, मागिल सभेचे इतिवृत्तांत आता आपली निवडणूकीची सभा झाली. त्याच्या अगोदर तुम्ही इतिवृत्तांत दिली आम्ही सभेमध्ये होतो. निवडणूकीच्या सभेमध्ये होतो त्याचे अजुन आले नाही.

**नगरसचिव :-**

ही विशेष सभा आहे. विशेष सभेला इतिवृत्तांत येत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ही विशेष सभा आहे. पुढची जी सभा होईल त्यामध्ये इतिवृत्तांत येईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६, पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे आपण ह्याच्यामध्ये ६ कोटी रू. ची तरतुद केलेली होती. त्यातले ४ कोटी ७० लाख रू. आपण खर्च केले. ते आपण इथे ८ तारखेपर्यंत दाखवले ते कुठे गेले?

**दिपक खांबित :-**

खर्च केले म्हणजे तेवढ्या रकमेची कामे प्रस्तावित आहे.

**जुबेर इनामदार :-**

आहेत इथे दाखवली म्हणजे गोषवाऱ्यामध्ये बरोबर दिलेली नाही. तर ४ कोटी ७० लाख रू. चे नविन रस्ते बांधतात ते केले का?

**दिपक खांबित :-**

४ कोटी ७० लाख रू. ची कामे ही चालू वर्षात प्रपोज केलेली आहे. एवढी कामे आपली चालू आहेत. काही कामे पुर्ण झाले असतील काही कामे चालू आहेत.

**शानु गोहिल :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ मधील विषयानुसार महापालिकेच्या मुळ अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये रूपये चार कोटीची तरतुद प्रभाग निधीसाठी करणेत आलेली आहे. प्रभाग समित्यांचा कार्यकाल चालू आर्थिक वर्षापर्यंत म्हणजे ३१ मार्च २००९ पर्यंत आहे. मा. महासभेमध्ये झालेल्या प्रभाग समितीच्या स्थापनेचा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई येथे न्याय प्रविष्ठ आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी अजुन पाच महिन्यांचा अवधी लागणार आहे. सदर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चार समित्या ह्या घटनात्मक समित्या असुन त्यासाठी केलेली तरतुद ही न्यायालयीन निकाल येईपर्यंत त्याच कारणासाठी राखून ठेवण्यात यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सुनिता पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**पिठासिन अधिकारी :-**

हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८६ :-**

स्थायी समिती पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ७९ :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ मधील विषयानुसार महापालिकेच्या मुळ अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये रूपये चार कोटीची तरतुद प्रभाग निधीसाठी करणेत आलेली आहे. प्रभाग समित्यांचा कार्यकाल चालू आर्थिक वर्षापर्यंत म्हणजे ३१ मार्च २००९ पर्यंत आहे. मा. महासभेमध्ये झालेल्या प्रभाग समितीच्या स्थापनेचा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई येथे न्याय प्रविष्ठ आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी अजुन पाच महिन्यांचा अवधी लागणार आहे. सदर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चार समित्या ह्या घटनात्मक समित्या असुन त्यासाठी केलेली तरतुद ही न्यायालयीन निकाल येईपर्यंत त्याच कारणासाठी राखून ठेवण्यात यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- सौ. सुनिता कै. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८७, पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (आरोग्य विभाग)

**अनिल सावंत :-**

पिठासिन अधिकारी साहेब, ह्याच्यामध्ये चालू आर्थिक वर्षामध्ये कुटूंब नियोजन प्रचार व प्रसार आरोग्य विषय विशेष कार्यक्रम आणि एडस नियंत्रण कार्यक्रम याच्यासाठी १५ लाख रू. ची तरतुद होती. आणि अजुनपर्यंत जवळ जवळ ७ महिने झाले त्याच्यातला एक पैसा सुद्धा खर्च झालेला नाही. तर, ह्यात जे आरोग्य अधिकारी आहेत त्याचे असे म्हणणे आहे की, ह्या तिन्ही उपक्रमांची या शहरामध्ये काही गरज नाही. त्याचे स्पष्टीकरण काय आहे? ह्यातला एक ही पैसा खर्च झालेला नाही. कुटूंब नियोजन, एडस नियंत्रण आणि आरोग्य विषेश कार्यक्रम हे किती महत्वाचे सेंट्रल गर्व्हरमेंट चे कार्यक्रम आहे. आणि असे असून सुद्धा ह्यामध्ये आर्थिक बजेटमध्ये जी प्रोव्हीजन केली होती. त्यापैकी एकही पैसा खर्च झालेला नाही. ह्याचे कारण काय? आरोग्य अधिका-यांना विचारा ह्याचे कारण काय आहे? ह्यांचे उपक्रम हाती घेतले नाही की, त्याला त्याची गरज वाटत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. महसूल मंत्री राणे साहेब, ह्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात असल्यामुळे तिथे महापालिकेतुन ते उपस्थित आहे.

**अनिल सावंत :-**

आरोग्याचे इतर कोणी अधिकारी असतील ना कोणतरी डॉक्टर असतील. त्यांचा विषय आहे. कोणतरी डिपार्टमेंटच्या जबाबदार व्यक्ती इथे हजर पाहिजे. पिठासिन अधिका-यांना मी विनंती करतो की, ह्या विषयी विशेष स्पष्टीकरण प्रशासनामार्फत दिले गेले नाही. ह्यामुळे हे प्रकरण फेटाळून पुढच्या सभेमध्ये व्यवस्थित गोषवारा घेवून यावा. खर्च का केला नाही? याची सविस्तर माहिती देण्यात यावी. त्यानंतर पूढच्यावेळी हा विषय आणावा.

**जुबेर इनामदार :-**

विषय आणताना २२ लाख रू. खर्च केलेले आहे त्याबद्दल सुद्धा सविस्तर माहिती घेवून यावी.

**पिठासिन अधिकारी :-**

प्रकरण क्र. ८७ याची सविस्तर माहिती नसल्यामुळे हा विषय पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर माहिती घेवून यावे. अशी मी विनंती करतो.

**प्रकरण क्र. ८७ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (आरोग्य विभाग)

(सदरचा विषय सविस्तर माहिती नसल्यामुळे मा. पिठासिन अधिकारी यांच्या आदेशान्वये तहकूब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८ व ८९, पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (आरोग्य विभाग व परीवहन विभाग)

**अनिल सावंत :-**

पिठासिन अधिकारी साहेब, हा जो रिएप्रोप्रिएशनचा प्रस्ताव आणलेला आहे. त्याच्यावर अग्निशमन अधिका-याची सही नाही. तर त्यांचे त्याविषयी काय मत आहे?

**जुबेर इनामदार :-**

खतगांवकर साहेब, आपल्या ह्याच्यामध्ये सप्टेंबर २००८ अखेरपर्यंत झालेला खर्च किंवा होणारा अंदाज खर्च असा कुठे ही काहीही उल्लेख केलेला नाही. रिकामा ठेवलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्या बद्दल मी माहिती सांगतो. महापालिका अर्थसंकल्पामध्ये अग्निशमन विभागामध्ये सव्वा पाच कोटी रू. ची तरतुद होती.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ मधील विषय क्र. ८८ व ८९ नुसार महानगरपालिकेच्या नमुक क्र. १० नियम ३० (३) अनुक्रमांक १ मध्ये अग्निशमन विभागातील वाहने खरेदी करणे याकरिता रूपये ५,२५,००,०००/- इतक्याची तरतुद करण्यात आलेली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. २४/२००७ निकाल दि. २७ जुन २००७ या आदेशास बांधील राहून सदर तरतुद फक्त अत्यावश्यक वाहनांकरिताच खर्च करणे बंधनकारक आहे. सदर निकाला अगोदर महापालिकेचे उपायुक्त श्री. पानपट्टे यांनी तशाबाबतचा स्वतःचा सत्यप्रतिज्ञा लेख उच्च न्यायालयाकडे याच प्रकरणी सादर केलेला आहे. तद्नंतर सदर आदेश याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्या कारणास्तव अत्यावश्यक वाहने खरेदी करण्याच्या तरतुदीतुन कोणत्याही प्रकारे अन्य प्रयोजनाकरिता या लेखाशिर्षातुन पुर्नविनियोजन करू नये.

तसेच चार प्रभाग समिती विभागात प्रत्येकी एक रूग्णवाहीका, पाण्याचे टँकर इत्यादी खरेदी करावे.

**जुबेर इनामदार :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

खतगावकर साहेब, ह्याला कशाला आपल्याकडे किंमत नाही का? आता पानपट्टे साहेबांनी ॲफिडेविट दिले. आणि हा आदेश आहे. मला एक सांगा तुम्ही ७० लाख रू. ह्याला नक्की केले. नविन गाडी जी आपल्याला ५ कोटी रू. ची घ्यायची आहे. ह्याचे व्हॅल्युएशन कोणी काढले? असा अधिकारी आहे का? की, त्याला माहित आहे ५ कोटी रू. ची गाडी घ्यायची आहे. तर कमीत कमी एडव्हान्स पोटी ७० लाख रू. च द्यायला लागतात किंवा ५० लाख रू. द्यायला लागतात. ही ॲथॉरिटी कोण आहे? आणि तसे असेल तर तसे सांगा म्हणजे मला माझी सुरूवात करायला. हे ॲफिडेव्हीट आहे ते पानपट्टे साहेबांनी दिले ते तुम्ही वाचले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हाला प्रशासनाकडून जी माहिती अपेक्षित आहे तेच मी सांगत होतो. पण आपण ठराव मांडलात.

**मिलन म्हात्रे :-**

करणार काय? हा विषयच नाही झाला पाहिजे. तुम्ही त्याच्यात हात ही नाही टाकला पाहिजे. ३१ मार्चला तुम्हाला काय करायचे ते करा. २८ मार्च, २५ मार्च हे आम्ही समजु शकतो. आता ती गाडी खरेदी करण्यासाठी ४ वेळा आपल्याकडे प्रस्ताव मा. महासभेत झाला. त्याच्यानंतर मोठी गाडी करण्यासाठी मा. महासभेत ठराव झाला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पाच गाड्या खरेदी करण्याचा झाला.

**मिलन म्हात्रे :-**

झाला ना. त्याच्यानंतर लागणारी साहित्ये, लागणारा इतर खर्च, वाहनांचे जे काही तुमचे रजिस्ट्रेशन्स आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या मताशी प्रशासन सुद्धा सहमत आहेत. ही तरतुद आहे. ह्या पाच गाड्यावर पुर्ण खर्ची पडेल.

**मिलन म्हात्रे :-**

आपले प्रशासन चालते कसे ते बघा. तुमच्याकडे त्याची सही आहे का बघा. हा तुम्हाला अत्यावश्यक नाही वाटत का? सचिव साहेब, तुम्ही पेपर कसे काय ॲक्सेप्ट करता? तुमच्या प्रस्तावावर अग्निशमन अधिकाऱ्याची सही आहे का? माझ्या करिता चांगले आहे. माझ्याकरिता वाईट नाही. अग्निशमन अधिकाऱ्यांनी त्याच्यावर खुलासा करावा. तुम्ही महत्वाचे रिएप्रोप्रिएशन त्यांच्या लोड मधून लेखाशिर्षातुन घेता त्या अधिकाऱ्याला कमीत कमी कन्सेन्ट घ्या. कोर्टाचे आदेश आहेत. तुम्हाला त्याचे ही काही पडलेले नाही. कन्टेम्प्ट ची नोटीस लावायला देतो. मग करा काय करायचे आहे ते करा आम्ही उगीच वर्ष वर्षानवर्षे चपला नाही घासत. अधिकाऱ्यांनी आणि पुढाऱ्यांनी एवढे पुढे जावू नये की, जेणे करून आम्हाला आमची हरकत करायला लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा त्या प्रस्तावाला मा. आयुक्त साहेबांची मान्यता आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आयुक्त आयुक्त करू नका. कोर्टापेक्षा आयुक्त साहेब मोठे आहेत का? हे न्यायालयीन निकाल जे आहेत ते आयुक्तांपेक्षा कमी आहे.

**मा. सभापती :-**

कोर्टाचे तुम्ही कोर्टात काय करायचे ते करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

मी करतो ना. आयुक्त म्हणजे काय? आमचा ठराव तुम्ही पास केला. सांगा ठराव चुकीचा आहे. विखंडनाला पाठवा. मग आम्ही बोलू ना. पानपट्टे साहेबांचे त्याच्यामध्ये ॲफिडेव्हीट आहे. अग्निशमन विभागाचे उपायुक्त असताना त्याच्यानंतर निकाल झालेला आहे. तुम्ही २५ मार्च पर्यंत ती बजेटची प्रोव्हीजन कुठे ही ट्रान्सफर करू शकत नाही. तुम्हाला क्लिअर सांगतो. उठसुठ हा हॉस्पीटलमधून तरतुद वगळली. मग करूच नका ना. तुम्ही कशाला करता? एकीकडे कोर्टात नेता आणि दुसरीकडे बजेटमध्ये प्रोव्हीजन नाही. हे सुद्धा पानपट्टे साहेबांनी ॲफिडेव्हीट मध्ये दिले. बजेटमध्ये प्रोव्हीजन नसल्या कारणाने आम्हाला वाहने खरेदी करता येत नाही. असे त्यांचे ॲफिडेव्हीट आहे. हे सगळ तुम्हाला मजाक वाटतो काय? एकीकडे तुमच्या उपायुक्तांनी सांगायचे की, ह्या बजेटमध्ये वाहने खरेदी करायला प्रोव्हीजन नाही म्हणून आम्ही खरेदी करत नाही. आणि केल्यानंतर तुम्ही ह्या त्या मार्गाला पैसे सगळीकडचे पैसे फिरवता का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ह्यासाठी मी आपल्याला खुलासा करतो करुन देतो.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे जे स्थायी समितीमध्ये झाले ते तुम्ही आयुक्तांच्या कानावर टाका. मी तर पत्र देणारच आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही ह्या ठिकाणी निवेदन केले. त्या अनुषंगाने आयुक्त साहेबांचे या भुमिकेत काय मत आहे, ते मी सभागृहाला सांगु इच्छितो. सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे. ह्या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये अग्निशमन विभागकरीता ५ कोटी २५ लाख रु. ची तरतुद आहे आणि मा. उच्च न्यायालयात सन्मा. पानपट्टे साहेबांनी ॲफीडेव्हीट केल्याप्रमाणे आपण ह्या आर्थिक वर्षामध्ये एकूण ५ वाहने खरेदी करण्याचा आपण आवश्यक ती प्रशासकीय मंजुरी प्राप्त केलेली आहे आणि त्या अनुषंगाने ती कारवाई प्रगती पथावर आहे. साधारणतः चार वाहने आहेत. दोन लहान वाहने आणि दोन मोठी वाहने ह्यासाठी १ कोटी २५ लाख रु. खर्च अपेक्षित आहे. ते आम्ही कायम ठेवलेले आहे. आणि जे मुख्य रेस्क्यु एरिया लॅडर व्हॅन ज्याचा खर्च ५ कोटी रु. अपेक्षित आहे. पण त्याची पूर्ण परचेसिंगची कारवाई ह्या ३१ मार्चपर्यंत निश्चितच पूर्ण होणार नाही. तर त्यासाठी त्यांना अग्रीम देण्यासाठी मा. आयुक्त साहेबांकडे आणि मा. महापौर साहेबांच्या अध्यक्षेतखाली बैठक झाली. ते आतापर्यंत झालेला खर्च आणि पुढे करावयाचा खर्च, तर या बैठकीमध्ये मा. महापौर आणि मा. आयुक्त साहेबांनी जो निर्णय घेतला की, एरियल लॅडरसाठी प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. टेंडर काढायला हरकत नाही आणि जो जास्तीचा तरतुद आहे. मार्चपर्यंतच खर्च होत नसल्यामुळे एक कोटी रु. ची रक्कम त्या कामकाजासाठी कायम ठेवून येणाऱ्या अर्थसंकल्पात निश्चितच एरियल लॅडरची पुन्हा पुर्नतरतुद केली जाणार आहे. आणि ही शिल्लक राहणारी तरतुद.....

**मिलन म्हात्रे :-**

१ कोटी रू. कुठे तरतुद केली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग, दाखवा ना. कागदावर दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

१ कोटी २५ लाख रू. हे ४ वाहनांसाठी ठेवले आणि १ कोटी रू. एरियल लॅडरसाठी ठेवले.

**मिलन म्हात्रे :-**

१ कोटी रु. दाखवा ना कुठे आहे ती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एकूण तरतुद ५ कोटी २५ लाख रू. ची आहे. यामधून दोन कोटी दहा लाख रू. हे आरोग्य विभागाला वर्ग केल्यानंतर तीन कोटी वाहन विभागाकडे ५० लाख रू. १ कोटी २५ लाख रू. ४ वाहनांसाठी.

**मिलन म्हात्रे :-**

सार्वजनिक सुरक्षितता अग्निशमन करिता आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

बरोबर आहे. त्या अंतर्गत ४ वहाने आपल्याला खरेदी करायचे आहे. त्यासाठी १ कोटी २५ लाख रू. आहे. आणि आपण आपल जे काम टेंडर केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ही वर्ग तरतुद बायपरकेशन केले. त्याच्यामध्ये तुम्हाला फायर ब्रिगेड करता एम्ब्युलन्स अत्यावश्यक नाही वाटली. तुम्हाला पाण्याचे टँकर अत्यावश्यक नाही वाटले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

फायर ब्रिगेडला ॲम्ब्युलन्स नसतात. आरोग्य विभागाला.

**मिलन म्हात्रे :-**

कोण बोलते? तुम्ही ज्या ठाण्या महापालिकेत काम केले ना माहितीच्या अधिकारात माझ्याकडे आता माहिती उपलब्ध आहे. जेवढी जेवढी फायर स्टेशन आहेत त्यांना तेवढे सेप्रेट ॲम्ब्युलन्स दिले. ज्या महापालिकेतुन तुम्ही आलात ना मी तिकडची गोष्ट करतो आणि तुम्ही आपल मत नोंदवा की, फायर ब्रिगेडला ॲम्ब्युलन्स नसते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

फायर ब्रिगेड म्हणजे पूर्ण विभागाला ॲम्ब्युलन्स केलेले आहे. जर तुम्हाला फायर ब्रिगेडला ॲम्ब्युलन्स करायची असेल तर करू शकता. आपल्या शहरात जे प्रभाग आहे. त्याचे व्यवस्था आपण केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब प्रभागाची गोष्ट निराळी आहे. आपल्या ॲम्ब्युलन्स सगळ्या महाराष्ट्रात, गुजरात, आंध्रापर्यंत जातात. १५-१५ दिवस आपल्याला ॲम्ब्युलन्स अव्हेलेबल नसते. आग लागली तर तुमच्या बरोबर ॲम्ब्युलन्स आहे का? प्रत्येक महापालिकांची माहिती माझ्या थैलीमध्ये आहे. सगळीकडे असतात. तुम्हाला ती अत्यावश्यक वाटली नाही का? त्या रस्त्यापेक्षा तुम्हाला ॲम्ब्युलन्स अती महत्वाची नाही वाटली. पाण्याचा टँकर.

**मा. सभापती :-**

तुम्ही जी गोष्ट सांगता ते बरोबर आहे. पण आपल्याकडे कुठलीही ॲम्ब्युलन्स चालू नाही. तुम्ही आणखिन आणायला सांगता म्हणजे तुम्हाला काय वाटते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला असे वाटते का? महापालिकेच्या आयुक्तांची गाडी बंद करा. मा. महापौरांच्या गाड्या बंद करा. त्यापण चालू नसतात.

**मा. सभापती :-**

आपण चार प्रभागाला ॲम्ब्युलन्स दिलेले आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

कुठे दिले? त्यांनी सांगावे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सरळ मुद्दा असा आहे की, सव्वा पाच कोटी रू. ची तरतुद आहे त्यात आपल्याला ह्यावर्षी ५ गाड्या खरेदी करता येतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही परत परत रिपिट करू नका. ऐकून घ्या. आरोग्य विभागाकडे तुम्ही २ कोटी १० लाख रू. वर्ग केले त्याच्यामध्ये.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

करणार आहोत. केली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये तुम्हाला मी सांगतो ती वाहने तुम्ही ॲडजेस्ट केली का? नाही. तुम्हाला ते अत्यावश्यक वाटले नाही. प्रशासनाला मा. आयुक्त, मा. महापौर साहेब म्हणा जे नॉर्म्स आहेत. तुम्ही नॉम्स तर वाचा. तुमच्याकडे अनेक पत्र आहेत त्या मा. आयुक्त साहेबांच्या इन वर्ड रजिस्टर मध्ये माहिती सगळी मिळवली. तुमच्याकडे काय काय पत्रे आली ते सगळे मला माहित आहेत. आणि त्याच्यावर प्रशासनाने दिड दिड वर्ष कारवाई केलेली नाही. मंत्रालयातुन तुम्हाला चार चार वेळा रिमाईंडर आले आहेत. मी सांगतो दांडेकर बाईंची पत्रे आहेत. त्याच्यावर तुम्ही काहीही कारवाई केलेली नाहीत. गर्व्हमेंट परत परत रिमाईन्डर पाठवते. ह्याचे उत्तर पाठवा सुधारित प्रस्ताव पाठवा. अमुख करा तमुख करा. आपल्याला वेळच नाही. आणि तुम्ही असेल तर सांगा ना. माझ्याकडे कॉपी आहे मी आता सादर करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आपण वाहनांची चर्चा करा.

**मिलन म्हात्रे :-**

त्या वाहनांच्या बद्दलच बोलतो. अग्निशमन विभागा बद्दलच बोलतो. एवढ वगळून जर साडे तीन करोड रू. राहतात. तुमच्या काही महत्वाची अपेक्षित पूर्वीची पूढे वाहने घ्यायची आहेत. ह्या ॲफिडेव्हीट नुसार त्याच्यासाठी तुम्ही तरतुद करा. त्यानंतर तुम्ही २५ मार्च २००९ नंतर जर काही राहिले तर तुम्ही ते....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या पाच वाहनाशिवाय अजून जास्तीचे वाहने खरेदी करायची असेल तर ह्यालाच तरतुद वाढवावी लागेल. आहे त्या तरतुदीत होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

का नाही होणार? किती बाकी आहेत? कुठे दिले? साहेब, आपणच म्हणता दोन करोड १० लाख रू. खाली ५० लाख रू. आणि खाली सव्वा करोड रू. इकडे तुमचे साडे तीन करोड रू. अगदी क्लिअर कट दिसतात, एक्सेस असल्याचे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक्सेस नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एक्सेस किती आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ॲक्सेस पाच पैसे सुद्धा नाही. प्रश्न असा आहे की, जी रक्कम आमच्या कडे आहे ती प्रशासकिय मंजुरी मा. महासभेने आम्हाला दिलेली आहे. त्या विभागासाठी आणि परचेसिंगची कारवाई आणि खरेदीची चालू आहे. पण, हा पूर्ण खर्च ३१ मार्चपर्यंत पूर्ण होणार नाही. असे मत मा. आयुक्त आणि मा. महापौर यांचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो ३१ मार्च पर्यंत राहणारी रक्कम किती? त्या वाहनांच्या अलीकडची ५ मधले वाहनांकरिता दिड गेले, राहिले ३ कोटी ५० लाख रू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण वाहनांसाठी फक्त ५० लाख रू. दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमच्या नविन वाहनांची तरतुद सव्वा करोड रू. ची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सव्वा करोड रू. पुर्ण गाड्यांचे सव्वा करोड रू. ची तरतुद ही त्या चार वाहने खरेदी करण्यासाठी कायम लागेल. ती रक्कम रद्द करता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. ५ करोड २५ लाख रू. मध्ये सव्वा करोड रू. गेले राहिले ४ करोड रू. मग, चार करोड रू. चे बोला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

चार करोड रू. चे एकच वाहन आहे. ५ कोटी रू. पेक्षा जास्तीचे...

**मिलन म्हात्रे :-**

ते ही विसरून जा. त्याकरिता १ करोड रू. किंवा दिड करोड रू. पकडा. राहिले किती अडीच करोड रूपये.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे. ते तुम्हाला सांगतो ते २ करोड १० लाख रू. आरोग्य विभागाला देतात.

**मिलन म्हात्रे :-**

मी सुद्धा तेच बोलतो.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, तुम्ही सांगा तुम्ही प्रस्ताव मांडा ना. आम्हाला काही हे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे हे अडीच करोड रू. राहिले त्याच्यामध्ये त्याला जी आवश्यक असणारी वाहने आहेत ती तुम्हाला आवश्यक वाटली नाही का? की आता चार फायर स्टेशन होणार आहेत. तिकडे पाण्याचे टँकर्स लागणार, ॲम्ब्युलन्स लागणार. त्या नॉर्म्समध्ये आहेत. जे कायद्यात आहे ते तुम्हाला अत्यावश्यक वाटले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या शहरासाठी अत्यावश्यक नॉम्सवर काढले ना ज्या फिनाले सिस्टममध्ये ते खुप मोठे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आहे १० टक्के तर करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही ठरवा. आम्हाला काही नाही.

**मा. सभापती :-**

आपण ठरवून घ्या ना. आपण काय करायचे.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो. ही क्लिअर कट तरतुद असताना ती सोडून तुम्ही भलती कडेच वर्ग करताय. पहिले ते करा. मग राहिलेली रक्कम करा आम्ही त्याला मंजुरी देतो. त्या ठरावात मी सुचना सुद्धा करतो की, ज्या तुमच्या चार फायर स्टेशन ला ॲम्ब्युलन्स लागतील, पाण्याचे टँकर लागतील. एक रेसक्यु तुमच्या इस्ट साठी लागणार. एकतर तरतुदी होत नाही. साहेब तुम्ही ॲफिडेव्हीट निट वाचा. ह्याच्यामध्ये तुमच्याच उपायुक्तांनी क्लिअर कट लिहिलेले आहे. आतापर्यंत तरतुद करण्यात आलेल्या नाहीत हे पानपट्टे साहेबांनी सत्यप्रत वर लिहून दिले. आता ते सुदैवाने, दुर्दैवाने हजर नाही.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, झालेल्या ठरावांचे वाचन करा आणि कायम करून टाका.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यात आपली सुचना घ्या चार प्रभाग समितीच्या एरियामध्ये जे काही असतील ना त्याच्यामध्ये ॲम्ब्युलन्स आणि पाण्याचे टँकर अत्यावश्यक वापराकरिता खर्च करावी.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सचिव साहेब, इसके पहले कितने ठराव कम्प्लीट हो गये?

**नगरसचिव :-**

यह पहला है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मंजुर नामंजुर कुछ हुआ क्या?

**नगसचिव :-**

प्रकरण क्र. ८६ पहिला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपने पहले वाचन नही किया क्या? इतनी क्या गडबडी थी, पहले वाचन नही किया?

**अनिल सावंत :-**

सदस्यांनी वाचन केले आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सचिव साहब देखिये आप सचिव है। आपको आपके जिम्मेदारीयो का एहसास होना चाहिए। अगर कोई सदस्य, हमलोग भी कुछ गलत कर रहे हो तो आपको आपके जिम्मेदारीसे काम करना चाहिए। अगर आप ऐसा मान रहे है की, ये गलत है। तो मै कहूंगा की आपने गलती किया है तो आपके उपर....

(सभागृहात गोंधळ)

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यात दोन पद्धती आहेत. ठराव झाल्यानंतर वाचून कायम करण्याची सभागृहात गरज नसेल तर पुढचा विषय पुकारला जातो व पुढच्या सभेत प्रोसिडींगप्रमाणे तो कायम केला जातो.

**नगरसचिव :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ मधील विषय क्र. ८८ व ८९ नुसार महानगरपालिकेच्या नमुक क्र. १० नियम ३० (३) अनुक्रमांक १ मध्ये अग्निशमन विभागातील वाहने खरेदी करणे याकरिता रूपये ५,२५,००,०००/- इतक्याची तरतुद करण्यात आलेली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. २४/२००७ निकाल दि. २७ जुन २००७ या आदेशास बांधील राहून सदर तरतुद फक्त अत्यावश्यक वाहनांकरिताच खर्च करणे बंधनकारक आहे. सदर निकाला अगोदर महापालिकेचे उपायुक्त श्री. पानपट्टे यांनी तशाबाबतचा स्वतःचा सत्यप्रतिज्ञा लेख उच्च न्यायालयाकडे याच प्रकरणी सादर केलेला आहे. तद्नंतर सदर आदेश याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्या कारणास्तव अत्यावश्यक वाहने खरेदी करण्याच्या तरतुदीतुन कोणत्याही प्रकारे अन्य प्रयोजनाकरिता या लेखाशिर्षातुन पुर्नविनियोजन करू नये.

तसेच चार प्रभाग समिती विभागात प्रत्येकी एक रूग्णवाहीका, पाण्याचे टँकर इत्यादी खरेदी करावे. असा ठराव श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेला असुन त्या ठरावाला श्री. जुबेर इनामदार यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**प्रकरण क्र. ८८ व ८९ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (आरोग्य विभाग व परिवहन विभाग)

**ठराव क्र. ८० व ८१ :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ मधील विषय क्र. ८८ व ८९ नुसार महानगरपालिकेच्या नमुक क्र. १० नियम ३० (३) अनुक्रमांक १ मध्ये अग्निशमन विभागातील वाहने खरेदी करणे याकरिता रूपये ५,२५,००,०००/- इतक्याची तरतुद करण्यात आलेली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. २४/२००७ निकाल दि. २७ जुन २००७ या आदेशास बांधील राहून सदर तरतुद फक्त अत्यावश्यक वाहनांकरिताच खर्च करणे बंधनकारक आहे. सदर निकाला अगोदर महापालिकेचे उपायुक्त श्री. पानपट्टे यांनी

तशाबाबतचा स्वतःचा सत्यप्रतिज्ञा लेख उच्च न्यायालयाकडे याच प्रकरणी सादर केलेला आहे. तद्नंतर सदर आदेश याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्या कारणास्तव अत्यावश्यक वाहने खरेदी करण्याच्या तरतुदीतुन कोणत्याही प्रकारे अन्य प्रयोजनाकरिता या लेखाशिर्षातुन पुर्नविनियोजन करू नये.

तसेच चार प्रभाग समिती विभागात प्रत्येकी एक रूग्णवाहीका, पाण्याचे टँकर इत्यादी खरेदी करावे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९०, पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (वाहन विभाग)

**अनिल सावंत :-**

पिठासीन अधिकारी साहेब, एक गोष्ट मला जाणून घ्यायची आहे. हे जे सगळे रि एप्रोप्रिएशन आहे की, मिस एप्रोप्रिएशन आहे. बजेट झालेला आहे. बजेट होवून ८ महिने झालले आहे. ८ महिन्यामध्ये आपल्याला एवढी गरज भासली की, सर्व रि-एप्रोप्रिएशन साठी आपण करतो आणि सर्व पैसे त्या साफसफाईला पहिले १२ करोड रू. ची प्रोव्हीजन केली. नंतर १४ करोड रू. केले. आता १६ करोड केले आणि १६ करोड रू. करून सुद्धा आणखिन पैसे कमी पडतात या साफसफाईच्या टेंडर वरून स्थायी समिती चेअरमनच्या केबिनमध्ये कॉन्ट्रॅक्टर लोकांची मारामारी झाली. तरीसुद्धा त्या साफसफाईसाठी आपण पैसे वाढवतो. म्हणजे कशासाठी चालवायची ही महानगरपालिका जे बजेट शिल्लक आहे ते ट्रान्सफर करून घ्यायचे आणि सर्व पैशांचा सत्यानाश करायचा. मी ह्या विषयावर ठराव मांडतो. मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी गोषवारा वाचलेला नाही माझे जे वक्तव्य होते. ते प्रकरण ९० या विषयाशी संबंधित आहे. परत हे साफसफाई ठेका पद्धत वाहनचालक, परत साफसफाई ठेका आला. साफसफाई, ठेका पद्धत, कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी तुम्हाला गरज पडते नउ लाख ऐंशी हजाराची ऑलरेडी आपण साफसफाईसाठी आरोग्य विभागाला १६ कोटी प्रोव्हीजन केले होते. उपायुक्त पानपट्टे साहेब कुठे आहेत? त्यांची केबिन नेहमी कॉन्ट्रॅक्टर लोकांनी भरलेली असते.

**जुबेर इनामदार :-**

आता विषय आणू नका. ज्यांना उत्तर देता येत नाही त्या अधिकाऱ्यांना इथे बसवू नका.

**अनिल सावंत :-**

मा. पिठासिन अधिकारी यांच्या परवानगीने ठरावाचे वाचन करतो. स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ रोजीच्या विशेष सभेमध्ये ठेका वाहन चालकांखाली लेखाशिर्षामध्ये इतर विभागातून लेखाशिर्षातुन पुर्नविनियोजन करून वाढीव तरतुद करणेचा विषय आणला आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांवरती पुरेसा स्थायी व अस्थायी वाहनचालकांची उपलब्धता आहे. तसेच अनेक वाहने ठेका पद्धतीने घेण्यात आलेली आहेत. बऱ्याच अधिकाऱ्यांना / पदाधिकाऱ्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करण्यात येतो. असे असताना ठेका पद्धतीने घ्यावयाच्या वाहन चालकांसाठी सन २००८-२००९ अर्थ संकल्पात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. म्हणून अर्थसंकल्पात प्राथमिक शिक्षण विभागासाठी व सार्वजनिक सुरक्षितता या तरतुदीखाली केलेली तरतुद ही त्याच कामासाठी वापरावी. असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ रोजीच्या विशेष सभेमध्ये ठेका वाहन चालकांखाली लेखाशिर्षामध्ये इतर विभागातून लेखाशिर्षातुन पुर्नविनियोजन करून वाढीव तरतुद करणेचा विषय आणला आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांवरती पुरेसा स्थायी व अस्थायी वाहनचालकांची उपलब्धता आहे. तसेच अनेक वाहने ठेका पद्धतीने घेण्यात आलेली आहेत. बऱ्याच अधिकाऱ्यांना / पदाधिकाऱ्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करण्यात येतो. असे असताना ठेका पद्धतीने घ्यावयाच्या वाहन चालकांसाठी सन २००८-२००९ अर्थ संकल्पात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. म्हणून अर्थसंकल्पात प्राथमिक शिक्षण विभागासाठी व सार्वजनिक सुरक्षितता या तरतुदीखाली केलेली तरतुद ही त्याच कामासाठी वापरावी. असा मी ठराव मांडत आहे. असा ठराव श्री. अनिल सावंत यांनी मांडलेला असुन त्या ठरावाला श्री. जुबेर इनामदार यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**प्रकरण क्र. ९० :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. ८२ :-**

स्थायी समिती विशेष सभा दि. १४/११/२००८ रोजीच्या विशेष सभेमध्ये ठेका वाहन चालकांखाली लेखाशिर्षामध्ये इतर विभागातून लेखाशिर्षातुन पुर्नविनियोजन करून वाढीव तरतुद करणेचा विषय आणला आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांवरती पुरेसा स्थायी व अस्थायी वाहनचालकांची उपलब्धता आहे. तसेच अनेक वाहने ठेका पद्धतीने घेण्यात आलेली आहेत. बऱ्याच अधिकाऱ्यांना / पदाधिकाऱ्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करण्यात येतो. असे असताना ठेका पद्धतीने घ्यावयाच्या वाहन चालकांसाठी सन २००८-२००९ अर्थ संकल्पात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. म्हणून अर्थसंकल्पात प्राथमिक शिक्षण विभागासाठी व सार्वजनिक सुरक्षितता या तरतुदीखाली केलेली तरतुद ही त्याच कामासाठी वापरावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत.** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ११.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**